**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:28.12.2025** **वारः रविवार**

**ठळक बातम्या**

- **विकसित भारतासाठी मनुष्यबळाचं भांडवल या विषयावर आजही पंतप्रधानांच्या उपस्थितीत मुख्य सचिवांच्या राष्ट्रीय परिषदेत चर्चा**
- **आकाशवाणीवरुन मन की बात द्वारे आज पंतप्रधानांचा देशवासियांसोबत संवाद**
- **अगरबत्तीमधील रसायनं आणि कृत्रिम सुगंधी पदार्थांच्या वापरावर भारतीय मानक ब्युरोद्वारे नवीन निर्बंध आणि**
- **पुणे जिल्ह्यात 47 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त ऊस गाळप पूर्ण**

**आता सविस्तर बातम्या**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-सचिव परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजही नवी दिल्लीत मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेच्या अध्यक्षस्थानी असतील. कालच्या बैठकीनंतर मोदी यांनी समाज माध्यमावरली एका संदेशात सांगितलं की, प्रशासन आणि सुधारणांशी संबंधित विविध मुद्द्यांवर काल महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

यावर्षी या परिषदेचा मुख्य विषय "विकसित भारतासाठी मनुष्यबळाचं भांडवल" असून यात राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांसाठी सर्वोत्तम कार्यपद्धती आणि धोरणांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

राष्ट्रीय विकास संरचित आणि शाश्वत संवादाद्वारे केंद्र आणि राज्यांची भागीदारी मजबूत करणं हे या तीन दिवसांच्या या परिषदेचं उद्दिष्ट आहे. पंतप्रधानांच्या सहकारी संघराज्यवादाच्या दृष्टिकोनावर आधारित ही परिषद केंद्र आणि राज्यांमध्ये सहकार्याचा एक मंच म्हणून काम करत आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी मन कि बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरुन मन की बात या कार्यक्रमातून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 129 वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर , एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे एअर न्यूज, डीडी न्यूज तसच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रसारित होणार आहे. कार्यक्रमानंतर लगेचच त्याचं प्रादेशिक भाषांमधून भाषांतर प्रसारित केलं जाईल.

**वर्षाअखेर-पायाभूत-सुविधा**

2025 हे वर्ष भारताच्या विकास प्रवासातील एक निर्णायक अध्याय म्हणून ओळखलं जातं. या वर्षात धोरणांचं प्रगतीत आणि आकांक्षांचं निष्कर्षांमध्ये रूपांतर झालं. 'सुधारणांचे वर्ष' या विशेष मालिकेत, आज 2025 मधील पायाभूत सुविधा क्षेत्रात भारतानं केलेल्या प्रगतीचा एक अहवाल माझे सहकारी प्रशांत जाधव यांच्याकडून...

**स्क्रीप्ट-**

२०२५ या वर्षात भारतातील रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक, सागरी आणि डिजिटल अशा पायाभूत सुविधांच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तनकारी प्रगती झाली आहे. पायाभूत सुविधांसाठी सरकारचा भांडवली गुंतवणुकीचा खर्च २०२५-२६ मध्ये अकरा लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. रेल्वेच्या बाबतीत भारताचा पहिला उभा उचलला जाणारा, तमिळनाडुतील पंबन हा सागरी पूल, अभियांत्रिकी उत्कृष्टतेचं एक कालातीत प्रतीक आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे जोड प्रकल्पांतर्गत चिनाब पुलाचं उद्घाटन. प्रथमच, मिझोरम देशाच्या राष्ट्रीय रेल्वे जाळ्याशी जोडलं गेलं. देशातील मेट्रो जाळं एक हजार किलोमीटरपेक्षा जास्त झालं आहे, भारतात आज जगातील तिसरी सर्वात मोठी मेट्रो प्रणाली आहे. विमानतळांची संख्या आता १६३ झाली आहे. ही जगातील तिसरी सर्वात मोठी देशांतर्गत विमान वाहतूक व्यवस्था आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्याची लांबी एक लाख ४६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त झाली. या घडामोडींनी २०२५ मध्ये पायाभूत सुविधांनी आर्थिक विस्तार आणि राष्ट्रीय एकात्मतेला अधिक बळकटी दिली आहे.

**देशमुख-अमरावती**

भारताचे पहिले कृषिमंत्री भाऊसाहेब उपाख्य डॉक्टर पंजाबराव देशमुख जयंतीनिमित्त दिला जाणारा भाऊसाहेब देशमुख स्मृती पुरस्कार यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काल अमरावती इथं ज्येष्ठ वैज्ञानिक डॉक्टर विजय भटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. भाऊसाहेब देशमुख यांनी शेतीच्या शाश्वत विकासासह शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी याच्यासाठी आपल्या आयुष्याचा कण आणि कण झिजवला. त्यामुळं आज जे सकारात्मक चित्र निर्माण झालं आहे त्याचं श्रेय भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांना जात असल्याचं प्रतिपादन फडणवीस यांनी पुरस्कार स्वीकारताना केलं.

कृषी विद्यापीठाच्या अकोला इथल्या क्रीडांगणावर तीन दिवसांचं राज्यस्तरीय कृषीप्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. ते उद्यापर्यंत चालेल

**हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे....**

**वॉका-अगरबत्ती**

अगरबत्त्यांमध्ये मानवी आरोग्य आणि पर्यावरण यांच्यासाठी धोकादायक रसायनं आणि कृत्रिम सुगंधी द्रव्य मिसळली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय मानक ब्युरोनं राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्तानं शुक्रवारी नवी दिल्लीत निर्बंध प्रकाशित केले. यापुढं अगरबत्त्या खरेदी करताना ग्राहकांना कोणती माहिती आवश्यक असेल ते सांगणारा हा वृत्तांत...

**स्क्रीप्ट-**

पूर्वी नैसर्गिक घटक आणि सुगंधांचा वापर करुनच अगरबत्त्या तयार करण्याचा घरगुती व्यवसाय होता. शंभर वर्षांहून अधिक जुने अगरबत्ती उत्पादक अजूनही पर्यावरणाला अनुकूल घटक वापरुन अगरबत्त्या बनवत असतात. परंतु कालौघात अगरबत्त्यांची मागणी वाढल्यावर त्या अधिकाधिक आकर्षक आणि सुगंधी करताना त्यात घातक रसायनं आणि कृत्रिम सुगंधांचा वापर सुरु झाला.  परिणामी भारतीय मानक ब्युरोनं नवीन अधिसूचित मानकांमध्ये अगरबत्तीमध्ये काही कीटकनाशक रसायनं आणि कृत्रिम सुगंधी पदार्थांच्या वापरावर प्रतिबंध घातला आहे. यामध्ये किटकनाशकांमध्ये वापरली जाणारी अलेथ्रीन, पर्मेथ्रीन, सायपरमेथ्रीन, डेल्टामेथ्रीन आणि फिप्रोनील ही रसायनं तर बेन्झील सायनाईड, इथिल अक्रिलेट, आणि डायफेनिलामाईन यासारखे कृत्रिम सुगंध यांचा समावेश आहे. यापैकी अनेक पदार्थांवर जगभरात निर्बंध आहेत किंवा त्यांच्यावर बंदी आहे. या मानकांचा क्रमांक IS 19412:2025 असून अगरबत्तीच्या पुड्यावर बीआयएस मानक चिन्ह अंकित असलं पाहिजे. भारत हा

अगरबत्तीचा जगातील सर्वात मोठा उत्पादक आणि निर्यातदार आहे, या उद्योगाची वार्षिक उलाढाल सुमारे 8,000 कोटी रुपये असून, 150 हून अधिक देशांमध्ये सुमारे 1,200 कोटी रुपयांच्या अगरबत्त्यांची निर्यात होते. अगरबत्त्यांचा विविध प्रसंगी उपयोग वाढल्यामुळं देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अगरबत्ती उत्पादनांची मागणी लक्षणीयरीत्या वाढली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, संध्या खान, पुणे.

**<u>साखर</u>**

पुणे जिल्ह्यातील ऊस गाळप हंगामानं चांगला वेग पकडला आहे. खासगी साखर कारखान्यांमध्ये बारामती, दौंड शुगरची आघाडी कायम आहे. मात्र, सर्वाधिक निव्वळ साखर उताऱ्यामध्ये सहकारी साखर कारखानेच पुढं आहेत. त्यामध्ये श्री सोमेश्वर, दी माळेगाव, श्री विघ्नहर, श्री छत्रपती आणि भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचा समावेश आहे. जिल्ह्यातील 13 साखर कारखान्यांकडून आजअखेर 47 लाख मेट्रिक टन पेक्षा जास्त ऊस गाळप पूर्ण झालं आहे. निव्वळ 8  पूर्णांक 52 टक्के साखर उताऱ्यानुसार 40 लाख क्विंटलपेक्षा जास्त साखरेचं उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्तालयाच्या  अहवालात देण्यात आली आहे.

**<u>निवडणूक प्रशिक्षण</u>**

राज्यभरातल्या महापालिकांमध्ये मतदान आणि मतमोजणीसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण सुरू आहे. यात निवडणूक प्रक्रियेसह मतदान यंत्र हाताळणीची माहिती दिली जात आहे. निवडणुकीचं कर्तव्य बजावणे आणि हे प्रशिक्षण पूर्ण करणं प्रशासनानं सर्वांना बंधनकारक केलं आहे.

चंद्रपूरमध्ये सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी प्रस्तावित जाहिरातींचं पूर्वप्रमाणन, पेड न्युज संदर्भातील तक्रारी, त्याचं निराकरण याकरीता आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी मतदान केंद्रावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणास 26 डिसेंबरपासून सुरुवात झाली असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रियेच्या माहिती सोबतच EVM मशीनचं प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही दाखविण्यात येत आहे.

**<u>दुबार मतदार</u>**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी यावर्षी 1 जुलैची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. यामध्ये आयोगामार्फत दिलेल्या 45 हजार 588 संभाव्य दुबार मतदारांच्या यादीची बीएलओमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आल्यावर 13 हजार 336 दुबार मतदार आढळून आले आहेत.

**<u>काळोखे हत्या</u>**

रायगड जिल्ह्यातील मंगेश काळोखे हत्या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपी सूत्रधार रवींद्र देवकर आणि त्याचा मुलगा दर्शन देवकर या दोघांना नागोठणे इथून अटक केली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत शिवसेनेच्या मानसी काळोखे विजयी झाल्या. त्यानंतर दोनच दिवसात त्यांचे पती मंगेश काळोखे यांची हत्या करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल खोपोलीत काळोखे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालविला जाईल अशी ग्वाही शिंदे यांनी दिली.

**<u>पायलट प्रशिक्षण</u>**

अकोला इथं वैमानिक प्रशिक्षण केंद्राला केंद्र सरकारकडून अखेर मंजुरी मिळाली आहे. हे प्रशिक्षण केंद्र येत्या चार महिन्यांत सुरू होणार असून, यामुळं पश्चिम विदर्भातील युवकांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

**<u>भीमाशंकर मंदिर</u>**

पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप आणि पायरी मार्गाचं बांधकाम कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या दृष्टीनं मंदिर ९ जानेवारीपासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थाननं घेतला आहे, अशी माहिती पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काल दिली.

**<u>अंबर-कोल्हापुर-पीटीसी</u>**

अंदाज सव्वापाच कोटी रुपये किंमतीची अंबरग्रीस म्हणजे व्हेल माशाची उलटी विकण्यासाठी आलेल्या तिघांना कोल्हापूर पोलिकांनी काल अटक केली. पुणे-बंगळुरू महामार्गावर कणेरीवाडी इथं काल रात्री ही कारवाई करण्यात आली. सिंधुदुर्गमधील एका व्यक्तीकडून माशाची उलटी विक्रीसाठी आणल्याची कबुली आरोपींनी दिली.

**दुर्घटना**

धाराशिव जिल्ह्याच्या मौजे केशेगाव इथं कूपनलिकेमधील मोटर कप्पीच्या सहाय्यानं बाहेर काढत असताना वीजेचा धक्का बसून चारजण मरण पावले. कप्पीचा स्पर्श विद्युत तारांसोबत झाल्यामुळं ही दुर्घटना घडली.

**हवामान**

राज्यात सर्वत्र सूर्यप्रकाशयुक्त कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **विकसित भारतासाठी मनुष्यबळाचं भांडवल या विषयावर आजही पंतप्रधानांच्या उपस्थितीत मुख्य सचिवांच्या राष्ट्रीय परिषदेत चर्चा**
- **आकाशवाणीवरुन मन की बात द्वारे आज पंतप्रधानांचा देशवासियांसोबत संवाद**
- **अगरबत्तीमधील रसायनं आणि कृत्रिम सुगंधी पदार्थांच्या वापरावर भारतीय मानक ब्युरोद्वारे नवीन निर्बंध आणि**
- **पुणे जिल्ह्यात 47 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त ऊस गाळप पूर्ण**

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**